पूर्व माध्यमिक स्तरावरील भाषाविषयक पाठ्यक्रमावर आधारित अभ्यासपूरक संचाची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आंतरविद्याशाखीय विद्याशाखेतील शिक्षणशास्त्र विषयात पीएच. डी. पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

विजयमाला लक्ष्मण हनवते

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. बालाजी गणपतराव गिरगावकर

शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०२४

प्रस्तावना

शिक्षक वर्गात विषयाचे अध्यापन करताना पूर्ण क्षमतेने अध्यापन करू शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रमावर पूर्ण प्रभुत्व येण्यासाठी अभ्यासपुरक उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे प्रमुख ध्येयापैकी एक ध्येय आहे. यासाठी शाळेमध्ये वेगवेगळया कृती आणि कार्यक्रम विद्यार्थ्यांकडून करून घेतले जातात. त्यापैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे अभ्यासपूर्वक उपक्रम होय. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच किंवा अभ्यासक्रमास पूरक असणाऱ्या उपक्रमास अभ्यासपूरक उपक्रम असे म्हणतात. अभ्यासपूर्वक कार्यक्रमाचे काही प्रकार आहेत, त्यात भाग घेण्याच्या दृष्टिकोनातून वैयक्तिक कार्यक्रम हा एक प्रकार आहे. यामध्ये भाषण, कविता, नाट्य वाचन, स्वगत, निबंध, लेखन, कथाकथन इत्यादी उपक्रम येतात. सामूहिक कार्यक्रम प्रकारात समूह गायन, एकांकिका, सहल वादविवाद इत्यादी कार्यक्रम येतात.

अभ्यासपूर्वक उपक्रम हा केवळ विद्यार्थ्यांसाठी अभ्यास आणि शिकण्यातून थोडा वेळ काढण्याचा मार्ग नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाचा एक भाग आहे. मुलांमध्ये कलात्मक कौशल्य, सर्जनशीलता वाढवण्यासाठी, तर्क व समस्या सोडवण्यासाठी आणि मेंदूच्या क्रिया कलापांचे पालन पोषण करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आहेत.

अभ्यासपूर्वक उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आयोजित केले जातात. त्यात विद्यार्थी हरला किंवा जिंकला तरी फरक पडत नाही तर त्यात सहभाग महत्त्वाचा असतो. संघातील सहभाग विद्यार्थ्यांना एकत्र काम करण्यास आणि खेळण्यास मदत करतो. अभ्यासपूर्वक उपक्रम विद्यार्थ्यांना जीवनातील आवश्यक कौशल्य विकसित करण्यास आणि नैतिक मूल्य शिकण्यास मदत करतात. जेव्हा मूल ह्या उपक्रमांमध्ये भाग घेते, तेव्हा त्यांना लोकांसमोर काम करण्याचा आत्मविश्वास मिळतो. त्यामुळे स्टेजवर

येण्याची त्यांची अस्ताव्यवस्थता आणि लाजाळूपणा दूर होतो. ज्यामुळे त्यांचे संवाद कौशल्य, स्वाभिमान आणि आत्मविश्वास वाढतो.

अनेक अभ्यासांनी हे सिद्ध केले आहे की, जेव्हा विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या क्रिया कलापामध्ये भाग घेतात तेव्हा ते त्यांच्या मेंदूचा कार्य करण्याची क्षमता वाढवते. ज्यामुळे गणित व वाचन यासारख्या शैक्षणिक विषयांमध्ये त्यांची क्षमता वाढण्यास मदत होते. अभ्यासपूर्वक उपक्रमातून विद्यार्थी महत्त्वाची कौशल्य शकतात, ज्यात ध्येय निश्चित करणे, संघकार्य, भाषण यांचा समावेश होतो. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये स्वतःची क्षमता असते आणि जेव्हा एखादा विद्यार्थी त्याला आवडलेल्या क्रिया कलापाद्वारे यश प्राप्त करतो तेव्हा त्याचा आत्मविश्वास सुधारतो. जे विद्यार्थी शैक्षणिक विषयात आपले यश दाखवतात त्यांच्यासाठी अभ्यासपूर्वक उपक्रम त्यांच्या क्षमतांबद्दल अधिक आत्मविश्वास वाढविण्यास मदत करतात

संशोधनाची गरज

एका उपक्रमाच्या माध्यमातून अभ्यासपूर्वक उपक्रमाचे महत्त्व लक्षात येते. समजा विद्यार्थ्यांची सहल निघायची आहे. प्रथम सर्व विद्यार्थी मिळून सहलीची स्थूल योजना असतात त्या शैलीच्या सर्व कामांचे विचारपूर्वक पोटभाग निश्चित करतात, नंतर सर्व विद्यार्थ्यांचे कामांच्या स्वरूपानुसार गट करतात. प्रत्येक गटाला एक-एक पोट भागाचा सखोल अभ्यास करून तो कार्यान्वित करण्यासाठी योजना सुचवण्यास सांगतात, नंतर पुन्हा सर्व विद्यार्थी एकत्र येऊन सुचवलेल्या सर्व योजना अंतिम रूप देतात, त्यानुसार सहल पूर्ण करतात, परत आल्यावर अहवाल रूपाने सहलीतील अनुभव शब्दांकित करून दीर्घायुष्य करतात. अशा एकूण कार्यक्रमात विद्यार्थी काय शिकतात? सामूहिक रीतीने एखादी योजना कशी आखावी? घटनांतर्गत विचार कसा करावा? एकमेकांशी कसे वागावे? नवनव्या कल्पना कशा मांडाव्या? सुधाराव्या? कार्यान्वित

कराव्या? अशा कितीतरी गोष्टी ते अनुभवतात शिकतात. याचबरोबर सहजीवन, उपयोगी समाज पोषक वृत्ती व सवयी विकसित होतात. हे तर अभ्यासपूरक कार्यक्रमाच्या नानाविध उपयुक्ततांचे हे एक लहानसे उदाहरण आहे. अशा विविध कार्यक्रमातून आणखीही मूल्ये निर्माण होतात. सामाजिक शिस्त व कायदा पालन यांची सवय सहकार्य व सहिष्णुता आणि अनपेक्षित व नवनव्या प्रश्नांची आत्मविश्वासपूर्वक काम करण्याची सवय निर्माण होते.

संशोधनाची महत्त्व

आजच्या धकाधकीच्या जीवनात विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रमावर प्रभुत्त्व येण्यासाठी विद्यार्थ्यांना स्त्रोत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. वर्गाध्यापानात शिक्षक ज्या वेळेत शिकवितात तेव्हा ज्या विद्यार्थ्यांना समजत नाही तेव्हा काही विद्यार्थी शिक्षकांना प्रश्न विचारून शंका दूर करतात, परंतु काही विद्यार्थी मात्र प्रश्न विचारात नाही अशा विद्यार्थ्यांना अभ्यासपुरक उपक्रम महत्त्वाचे ठरतात, त्यामुळे अभ्यासपूरक उपक्रम संचाची निर्मिती करणे महत्त्वाचे आहे. या अभ्यासपूरक उपक्रम संचाच्या माध्यमातून दिशादर्शक अभ्यासपुरक संच तयार होण्यास मदत होणार आहे. अभ्यासपूरक उपक्रम संचाची निर्मिती करण्याअगोदर अभ्यासपूरक उपक्रमांची सद्यस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे.

विविध अभ्यास पूरक उपक्रमातून आणखीही मूल्य निर्माण होतात. सामाजिक शिस्त व कायदा पालन यांची सवय, सहकार्य व सहिष्णुता आणि अनुपेक्षित व नवनव्या प्रश्नांची आत्मविश्वास पूर्ण उकल करण्याची सवय निर्माण होते. अशी शैक्षणिक मूल्य निव्वळ परंपरागत ज्ञाननिष्ठ विषयांच्या अभ्यासातून मिळणार नाहीत म्हणून अभ्यासपूर्वक उपक्रम या चळवळी व्हायला पाहिजेत. अभ्यासपूर्ण उपक्रम आखण्याची व कार्यवाहीत करण्याची संधी जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांना दिली पाहिजे. शिक्षकांनी सतत लक्ष ठेवून मार्गदर्शन करावे, पण पुढारी किंवा अधिकारी म्हणून

शक्यतो मागे राहून जरूर पडेल तेव्हा मार्गदर्शन करावे. या सर्व बाबी विचारात घेऊन प्रस्तुत संशोधनात अभ्यासपूरक कार्यक्रमांचा संच तयार केला जाणार आहे. या संचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे. याअगोदर अभ्यासपूरक उपक्रम संचाची निर्मितीवर संशोधन झालेले नाही, त्यामुळे सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधन समस्या

पूर्व माध्यमिक स्तरावरील भाषा विषयक पाठ्यक्रमावर आधारित अभ्यासपुरक कार्यक्रम संचाची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास.

कार्यात्मक व्याख्या

पूर्व माध्यमिक स्तर

नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी या तीन इयत्ता ज्या स्तरामध्ये येतात ते स्तर म्हणजे पूर्व माध्यमिक स्तर होय.

अभ्यासपुरक कार्यक्रम संच

भाषाविषयक पाठ्यपुस्तकावर आधारित तसेच त्या पाठ्यपुस्तकातील घटकांवर प्रभुत्त्व निर्माण करून देणारा उपक्रमांचा संच म्हणजे अभ्यासपुरक कार्यक्रम संच होय.

भाषाविषयक पाठ्यक्रम

महाराष्ट्र राज्य पाठपुस्तक निर्मित मंडळाने तयार केलेल्या इयता सहावी ते इयत्ता आठवीच्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी या विषयांच्या अध्यापनासाठी निश्चित केलेले घटक म्हणजे भाषाविषयक पाठ्यक्रम होय.

परिणामकारकता

अभ्यासपुरक कार्यक्रम संचाच्या निर्मितीपूर्वी व निर्मिती नंतर येणाऱ्या गुणांमधील फरक म्हणजे परिणामकारकता होय.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

i. पूर्व माध्यमिक स्तरावर राबविण्यात येणाऱ्या अभ्यासपुरक उपक्रमाच्या संदर्भात पाठ्यपुस्तकांचे आशय विश्लेषण करणे.
ii. पूर्व माध्यमिक स्तरावर राबविण्यात येणाऱ्या अभ्यासपुरक उपक्रमाच्या सद्यस्थितीचा शोध घेणे.
iii. पूर्व माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपुरक उपक्रम संचाची निर्मिती करणे.
iv. पूर्व माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अभ्यासपुरक उपक्रम संचाची परिणामकारकता तपासणे.
v. पूर्व माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अभ्यासपुरक उपक्रम संचासंदर्भात शिक्षकांची मते जाणून घेणे.

संशोधन परिकल्पना

i. पूर्व माध्यमिक स्तरावर अभ्यासपुरक उपक्रम राबविले जात नाहीत .
ii. पूर्व माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्मित अभ्यासपुरक उपक्रम संच परिणामकारक आहे.

शून्य परिकल्पना

i. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

ii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील मुलांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

iii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील मुलींच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

iv. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

v. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील ग्रामीण भागातील मुलांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

vi. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील ग्रामीण भागातील मुलींच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

vii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

viii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील शहरी भागातील मुलांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

ix. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील शहरी भागातील मुलींच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

x. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील अनुदानित भागातील विद्यार्थ्यांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

xi. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील अनुदानित भागातील मुलांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

xii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील अनुदानित भागातील मुलींच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

xiii. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील विना-अनुदानित भागातील विद्यार्थ्यांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

xiv. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील विना-अनुदानित भागातील मुलांच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

xv. पूर्व माध्यमिक स्तरावरील प्रायोगिक व नियंत्रित गटातील विना-अनुदानित भागातील मुलींच्या गुणांत सार्थ फरक आढळत नाही.

गृहीतके

i. माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचा त्यांच्या अभ्यासपुरक उपक्रमांवर लक्षणीय फरक दिसून येतो. **(गायकवाड धनश्री, २०१९)**

ii. शाळांना अभ्यासपुरक उपक्रमांची अंमलबजावणी करताना अडचणीना सामोरे जावे लागते. **(कांबळे राजेंद्र, २०१०)**

संशोधनाची व्याप्ती

क्षेत्र व्याप्ती- प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक शाळांशी संबंधित आहे.

घटक व्याप्ती- प्रस्तुत संशोधनात इयत्ता सहावी, इयत्ता सातवी व इयत्ता आठवी या इयात्तांचाच समावेश केला आहे.

आशय व्याप्ती- प्रस्तुत संशोधनात अभ्यासपुरक उपक्रमांचाच समावेश केला आहे.

काल व्याप्ती- प्रस्तुत संशोधन २०२३ ते २०२६ या कालावधीत केले जाणार आहे.

संशोधनाची मर्यादा

क्षेत्र व्याप्ती- प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.

घटक व्याप्ती- प्रस्तुत संशोधन इयत्ता सहावी, इयत्ता सातवी व इयत्ता आठवी या इयात्तांपुरतेच मर्यादित आहे.

आशय व्याप्ती- प्रस्तुत संशोधन अभ्यासपुरक उपक्रमांपुरतेच मर्यादित आहे.

काल व्याप्ती- प्रस्तुत संशोधन २०२३ ते २०२६ या कालावधीपुरतेच मर्यादित आहे.

संशोधनाची परिमर्यादा

I. सदर संशोधनात नांदेड जिल्हयातील निवडक मराठी माध्यमांच्या शाळांचाच समावेश केला जाणार आहे.
II. सदर संशोधनात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे यांच्याद्वारे निर्मित भाषाविषयक पाठ्यपुस्तकांचाच समावेश केला आहे.
III. सदर संशोधनात संशोधक ज्या विद्यार्थ्यांकडून माहिती संकलित कारणार आहे, त्यांचे अनुभव, मनःस्थिती,आवड-निवड यावर संशोधकाचे नियंत्रण राहणार नाही.

प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनात एकूण पाच प्रकरणांचा समावेश केला जाणार आहे ते खालीलप्रमाणे आहेत.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे- सबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

प्रकरण तिसरे - संशोधन पध्दती

प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय

संशोधन पद्धती

सदर संशोधनात पूर्व माध्यमिक स्तरावरील इयत्तांच्या भाषाविषयक पाठ्यपुस्तकांचे आशय विश्लेषण करण्यात येईल. त्यानंतर अभ्यासपूरक उपक्रमांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करून, अभ्यासपूरक उपक्रम संचाची निर्मिती व त्याची परिणामकारकता अभ्यासली जाणार आहे यामुळे या संशोधनात एक पेक्षा जास्त संशोधन पद्धतींचा वापर होत असल्याने संशोधक बहुविध संशोधन पध्दतीचा वापर करणार आहे.

जनसंख्या

नांदेड जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील इ. ६ वी ते इ. ८ वी मधील सर्व विद्यार्थी सदर संशोधनाची जनसंख्या असणार आहे.

नमुना व नमूना निवड पद्धती

सदर संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक स्तरावरील इ. ६ वी ते इ. ८ वी मधील १२० विद्यार्थी नियंत्रित गटातील आणि १२० विद्यार्थी प्रायोगिक गटातील असे एकूण २४० विद्यार्थ्यांची निवड असंभाव्यतेवर आधारित सहेतुक नमूना निवड पद्धतीने, तसेच नांदेड जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे

५०० शिक्षक प्रस्तुत संशोधनाचा नमूना असणार आहे. नमूना निवडीसाठी असंभाव्यतेवर आधारित प्रासंगिक नमूना निवड पद्धतीचा वापर करणार आहे.

माहिती संकलनाची साधने

सदर संशोधनात माहिती संकलनासाठी प्रश्नावली, आशय विश्लेषण पद्धती, उपक्रम संच निर्मिती, पूर्वचाचणी, उत्तरचाचणी, सहामाही व वार्षिक परीक्षेतील गुण आणि मतावली यांचा वापर केला जाणार आहे.

संख्याशास्त्रीय साधने

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, अनोवा व टी-परीक्षिका, या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

संशोधनाची कार्यवाही

संशोधन समस्या निश्चित करणे

↓

संशोधन आराखडा तयार करणे

↓

अभ्यासपुरक उपक्रमांची सद्यस्थिती जाणून घेणे

↓

अभ्यासपुरक उपक्रमांच्या संदर्भात पाठ्यपुस्तकांचे आशय विश्लेषण करणे

↓

अभ्यासपुरक उपक्रम संचाची निर्मिती करणे

↓

नियंत्रित व प्रायोगिक गटाची पूर्वचाचणी घेणे

↓

प्रायोगिक गटावर अध्ययन उपक्रम संच राबविणे

↓

नियंत्रित व प्रायोगिक गटाची उत्तरचाचणी घेणे

↓

अभ्यासपुरक उपक्रम संचासंदर्भात शिक्षकांची मते जाणून घेणे

↓

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढणे

↓

संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर करणे

कालावधी

अ.क्र.	शीर्षक	कालावधी
१	संशोधन समस्या निश्चित करणे	२ महीने
२	संशोधन आराखडा तयार करणे	१ महिना
३	संदर्भ साहित्याचा आढावा घेणे	६ महीने
४	अभ्यासपुरक उपक्रमांची सद्यस्थिती जाणून घेणे	३ महीने
५	अभ्यासपुरक उपक्रमांच्या संदर्भात पाठ्यपुस्तकांचे आशय विश्लेषण करणे	६ महीने
६	अभ्यासपुरक उपक्रम संचाची निर्मिती करणे	३ महीने
७	पूर्वचाचणी घेणे	१ महीने
८	प्रयोगाची अंमलबजावणी करणे	४ महीने
९	उत्तर चाचणी घेणे	१ महीने
१०	अभ्यासपुरक उपक्रम संचासंदर्भात शिक्षकांची मते जाणून घेणे	४ महीने
११	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढणे	४ महीने
११	अंतिम अहवाल लेखन व प्रबंध विद्यापीठास सादर करणे	१ महिना
१२	एकूण	३६ महीने

अंदाजपत्रक

अ.क्र.	शीर्षक	खर्च
१	विद्यापीठ फी	५०,०००/-
२	पुस्तके ,मासिके व नियतकालिके	७०,०००/-
३	इंटरनेट व इतर सुविधा	२५,०००/-
४	टायपिंग व प्रिंटिंग	४०,०००/-
५	प्रवास खर्च	४०,०००/-
६	इलेक्ट्रोनिक साहित्य	६०,०००/-
७	सेमिनार सहभाग व प्रकाशन खर्च	५०,०००/-
८	एकूण	३,३५,०००/-

संदर्भ

- आगलावे, प्रदिप (२००७) ***सामाजिक संशोधन पध्दती***, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.
- भिंताडे, वि रा (२००६) ***शैक्षणिक संशोधन पध्दती,*** पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
- बापट, भा गो (१९७७) ***शैक्षणिक संशोधन***, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
- चव्हाण, किशोर (२०११ ऑक्टोबर) ***गुणात्मक संशोधन***, शिक्षणातील मर्मदृष्टी, ३०-३३.
- देशपांडे, कृ.प. (१९९६). ***शिक्षकांसाठी सहशालेय उपक्रम,***पुणे: कॉनटीनेनटल प्रकाशन.

- घोरमोडे, के यु (२००८) ***शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे,*** नागपूर : विदया प्रकाशन.
- गोखले, मंजुश्री (१९९४) ***सहशालेय उपक्रम- नवे मार्ग, नव्या दिशा.*** चैतन्य प्रकाशन: कोल्हापूर.
- गायकवाड, धनश्री (२०१९) ***माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचा त्यांच्या अध्यापनावर व अभ्यासपुरक उपक्रमांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.*** अप्रकाशित पीच.डी. प्रबंध. Retrieved 26 August 2024 ,From https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/308862
- कांबळे, राजेंद्र (२०१०) ***औरंगाबाद जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील अभ्यासपुरक उपक्रमांच्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास.*** अप्रकाशित पीच.डी. प्रबंध. Retrieved 26 August 2024 ,From https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/93185
- कुंडले, म बा (२०१३, ऑक्टोबर) ***शिक्षणातील नवप्रवाह,*** शिक्षण समीक्षा, ४५-४८.
- जरग, नामदेव(२०११,एप्रिल) ***सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन,*** जीवन शिक्षण ,१२-१६.
- पाटील, कृष्णकुमार(२०१३,डिसेंबर) ***माध्यमिक शिक्षकांच्या ,*** शिक्षण संक्रमण ,२७-२८.

मार्गदर्शक — संशोधक

प्राचार्य डॉ. बालाजी गणपतराव गिरगावकर — विजयमाला लक्ष्मण हनवते